## वेध

मी स्तब्ध बेंचवर डोळे मिटून
काळ्या पडद्याभोवती फिरणारी
'असंख्य वर्तुळे'
वेदनेच्या जबड्यातील यातनेनं साहिलेली
'जिव्हारी जखम'
पावलागणिक आयुष्याची गणितं बदलत जाणारी
मी स्तब्ध बेंचवर डोळे मिटून -
तर्क-वितर्काच्या वहिवाटेवर
बदलत जाणारे 'चेहरे-मोहरे'
भूत-वर्तमानाचा समन्वय साधताना
असंख्य वर्तुळातलं आपल्यात सामावणारं
'आपलं वर्तुळ'
स्वप्नांचे तुरे स्वतःभोवती गुंफताना
अन् केविलवाणे हास्य जपताना
कित्येक कावळे घरावरून
काव काव करीत गेले तरीही
मी स्तब्ध बेंचवर डोळे मिटून -
रस्त्यातील वणव्यातही शोधते माझा
'देदिप्यमान भविष्यकाळ'
मनाला घट्ट चिकटून राहिलेली
'टेंशन नावाची पाल'
झटकून टाकणार, तितक्यात
बेल वाजली
वर्गात मुलींचा कोलाहल
तत्वांची घायाळ तडफड
उष्ण श्वासांचे हुंदके
ओठांचे मूक आक्रोश
हृदयात धगधगणाऱ्या ज्वाळा आता
मी मात्र टक्क जागी बेंचवर वेगळीच कुणीतरी

**रेश्मा राणे**
मुंबई